# अध्यात्मशास्त्राच्या विविध अंगांचा बोध

## विषयसूची


१. प्रस्तावना ४

२. लेखक पू. अनंत बाळाजी आठवले यांचा परिचय ६

३. पू. अनंत आठवले लिखित प्रस्तुत ग्रंथाची वैशिष्ट्ये ९

४. ग्रंथातील लिखाणाच्या मांडणीविषयीची काही सूत्रे ११

५. प्रकरणे

  १. उद्‌बोधक लेख १२

  २. जिज्ञासूंनी विचारलेले काही प्रश्न आणि त्यांची उत्तरे ७८



**सनातनच्या चैतन्यमय ग्रंथसंपदेची ठळक वैशिष्ट्ये !**

- अध्यात्मातील प्रत्येक कृतीविषयी ‘का अन् कसे’ यांची शास्त्रीय उत्तरे !
- विज्ञानयुगातील वाचकांना समजेल अशा आधुनिक वैज्ञानिक भाषेतील (उदा. टक्केवारी) ज्ञान !
- तात्त्विक विवेचनच नव्हे, तर साधना कृतीत आणण्याविषयी मार्गदर्शन !
- अध्यात्मातील विविध गोष्टींच्या संदर्भात वैज्ञानिक उपकरणांद्वारे केलेले संशोधन, सूक्ष्म स्तरावरील प्रक्रिया दर्शवणारी चित्रे अन् लिखाण !

**सनातनच्या ग्रंथकार्यात सहभागी होऊन समष्टी साधना करा !**

- मराठी भाषेतील ग्रंथांचे संकलन करणे
- मराठी, हिंदी आणि इंग्रजी ग्रंथांचे विविध भाषांत भाषांतर करणे
- ग्रंथांची संरचना ‘इन्‌डिझाईन’ या संगणकीय प्रणालीत करणे

या कार्यांत सहभागी होण्यासाठी संपर्क करा –

(०८३२) २३१२३३४ किंवा granthgoa@gmail.com

# विषयसूचीतील क्रमांक १

## ।। श्रीकृष्णाय नमः ।।

## प्रस्तावना

**‘न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।’**

– भगवद्गीता, अ. ४, श्लोक ३८

अर्थ – ह्या जगात ज्ञानासारखे पवित्र (पवित्र करणारे) दुसरे काही नाही.

* लोक देवाची भक्ती करतात, पण त्यांना देव म्हणजे काय हे माहित नसते.

* लोक भक्ती करतात, पण देवाला कसा भक्त आवडतो हे माहित नसते.

* मायेतून सुटायला हवे हे ऐकून माहित असते, पण माया म्हणजे काय हे माहित नसते.

* मायेत का अडकलो आणि मायेतून सुटायचे कसे, हे माहित नसते.

* आपल्यात दुर्गुण आहेत हे कळते पण त्यांना घालवण्याने होणारा लाभ जाणत नाहीत.

* पुनर्जन्म होतो हे जाणतात, पण का होतो आणि कसा टाळावा हे ठाऊक नसते.

* भक्ती, कर्म, ज्ञान हे शब्द ऐकलेले असतात, पण त्या साधनांचे मर्म जाणत नाहीत.

* जीवात्मा, परमात्मा, ब्रह्म हे शब्द ऐकलेले असतात, पण त्यांचे स्वरूप कळलेले नसते.

* मोक्ष हा शब्द ऐकलेला असतो, पण मोक्ष म्हणजे काय हे माहित नसते.

पूर्ण माहिती नसतांना केलेले प्रयत्न दिशाहीन असल्याने भरकटण्याची शक्यता असते. त्यामुळे ध्येय गाठायला खूप वेळ लागू शकतो. कित्येक विषय असेही आहेत की ज्यांच्याविषयी चुकीची माहिती, अपसमजच असतात.

असे अनेक विषय सध्या जेवढे काही समजले आहेत तेवढे समजायला मला खूप अभ्यास, चिंतन आणि मनन करावे लागले. आयुष्याची अनेक वर्षे ह्यातच व्यतीत झाली. इतरांचा वेळ वाचावा, त्यांना तितके श्रम करावे न लागता ही सर्व माहिती आयती मिळावी आणि तेथून पुढे प्रयत्न करून ध्येय लवकर गाठणे त्यांना सोपे जावे, ह्या विचाराने लेख लिहिले. त्या लेखांचा साधकांच्या हितासाठी आणि प्रगतीसाठी एक ग्रंथ छापण्याचा निर्णय सनातनने घेतला, ही आनंदाची गोष्ट आहे. एकाद्या तरी वाचकाला लेखांपासून लाभ झाला तर लेख लिहिणे सार्थकी लागेल.

अपसमज आणि अज्ञान मिटून आत्म्याचे यथार्थ ज्ञान झाल्याने होणारा लाभ मुण्डकोपनिषदाच्या शब्दांत सांगून प्रस्तावना संपवतो.

**ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्त्वस्ततस्तु तं पश्यते निष्कलं ध्यायमानः ।।**

– मुण्डक, खण्ड १, मन्त्र ८

अर्थ – ज्ञानाच्या कृपेने मनुष्य शुद्धचित्त होतो आणि मग एकाग्रचित्त होऊन द्वैतरहित आत्मस्वरूपाचा साक्षात्कार करतो. F (SStAnA-AdhBo)

**– अनंत आठवले**

**।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।**




सनातन संस्था-निर्मित
'ऑडिओ ॲप'
**सनातन चैतन्यवाणी**

卐 योग्य उच्चारांसह देवतांचे नामजप
卐 स्तोत्रे, श्लोक अन् आरत्या (शब्दांसह)
卐 विविध सणांच्या वेळी करायच्या प्रार्थना

**आजच हे 'ॲप' विनामूल्य 'डाऊनलोड' करा !**

**स्तोत्रे इत्यादी एकदाच 'डाऊनलोड' करा आणि पुढे 'इंटरनेट'विना ऐका !**